तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

शिवाजी विद्यापीठांतर्गत सर्व परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार सुरू आहेत. अधिविभागप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापकांच्या मदतीने सोमवारपासूनच्या सर्व परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी २ फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने तीन दिवसाच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. यासंदर्भात राज्य शासनाने विद्यापीठाला कारणे दाखवा नोटीस काढली होती. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने प्राचार्य, अधिविभागप्रमुख, प्राध्यापकांच्या मदतीने परीक्षा सुरू केल्या. सोमवार २० फेब्रुवारीपासून कर्मचारी बेमुदत बंद पुकारणार आहेत. तरीही विद्यापीठ अंतर्गत सर्व परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होणार आहेत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा संचालक डॉ. जाधव यांनी केले आहे.